# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर

## GOVT. MEDICAL COLLEGE & HOSPITAL, NAGPUR

क्रं.शावैमरु/पाकगृह/ 1601४ /२०२१ दिनांक : 30 / 07 /२०२१

प्रति,

......................

......................

......................

विषयः- शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील कोविड रुग्णांना आहार पुरवठा करणे करिता तातपुरत्या स्वरुपात खानावळ सुरु करणे बाबत....

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यांत येते की शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील कोविड रुग्णांना आहार पुरवठा करण्यासाठी तातपुरत्या स्वरुपात खानावळ सुरु करणेकरीता खाली नमूद केलेल्यानुसार आहार पदार्थांकरीता दोन लिफाफा पध्दतीने सिलबंद लखोटयात दिनांकः 06 / 08 /२०२१ रोजी 03:00 वाजेपर्यंत सादर करण्यात यावे. यामध्ये लखोटा क्र.१ मध्ये तांत्रिक लिफाफा व लखोटा क्र.२ मध्ये दराचा लिफाफा असे वेगवेगळे सिलबंद लिफाफे एका लिफाफयामध्ये सादर करावे.

खाली दर्शविल्याप्रमाणे १) नाश्ता (डीस्पोझेबल पॅकींग कन्टेनरमध्ये, चम्मच व ग्लाससह), २) दुपारचे जेवण (फोरकप डीस्पोझेबल पॅकींग प्लेटमध्ये), ३) सायंकाळचा चहा/दुध (डीस्पोझेबल कपमध्ये) व ४) सायंकाळचे जेवण (फोरकप डीस्पोझेबल पॅकींग प्लेटमध्ये) **प्रती व्यक्ती प्रमाणे दर** मागविण्यांत येत आहे. याबाबतच्या अटी व शर्ती सहपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे राहतील.

| अ. क्र. | १) नाश्ता (सकाळी ७.०० ते ८.००) | २) दुपारचे जेवण (दुपारी १२.००) | ३) सायंकाळचा चहा (दु.३ ते४) | ४) सायंकाळचे जेवण (सा. ६.०० ते ७.००) |
|---|---|---|---|---|
| विवरण | चहा/कॉफी (१५० ml) आणि दूध (१५० ml) + अंकुरीत मूंग/मटकी/चना/चवळी (उसळ) पोहा/उपमा/ दलिया / (सोजी) एक प्लेट (६० ग्राम)/ + १ अंड (उकडलेली )दररोज | -फुलका/चपाती (३-५ नग आवश्यकतेनुसार) - वरण (१ वाटी ६५ ग्रॅम) - भाजी (१ वाटी ६० ग्रॅम) - भात (१ वाटी ६५ ग्रॅम -खिचडी (१ प्लेट १५० ते २०० ग्रॅम) आवश्यकतेनुसार | चहा/कॉफी (१५० ml) आणि दूध (१५० ml) | -फुलका/चपाती (३-५ नग आवश्यकतेनुसार) -वरण (एक वाटी ६५ ग्रॅम) -भाजी (एक वाटी ६० ग्रॅम) -भात (एक वाटी ६५ ग्रॅम) -खिचडी (१ प्लेट १५० ते २०० ग्रॅम) आवश्यकतेनुसार |
| दर | | | | |

सहप्रतः- अटी व शर्ती

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
नागपूर

Scanned By Scanner Go

अटी व शर्ती:-

| | |
|---|---|
| १) | सदर दर पत्रकाचे दरकरार हे तात्पुरत्या स्वरुपाचे असून फक्त कोविड रुग्णांना आहार पुरवठा करण्यापर्यंतच मर्यादित राहील. |
| २) | दरकरारामध्ये लागु असलेले जीएसटी, सर्व प्रकारचे खर्च इत्यादी सर्व करांसहित दर नोंदवावे. |
| ३) | दरपत्रकधारकांचे आहाराबाबत प्राप्त झालेले १)सकाळचा चहा-नाश्ता २)दुपारचे जेवन ३)सायंकाळचा चहा व ४) सांयकाळचे जेवन यांचे न्युनतम दर तसेच एकूण न्यूनतम दर या दोन्ही बाबींचा विचार करुन अंतिम दर निश्चित करण्यात येईल. |
| ४) | वरील अन्नपदार्थाच्या नगामध्ये/प्रमाणामध्ये रुग्णांच्या गरजेनुसार वाढ करावयाची असल्यास तशी सुचना वेळोवेळी दरपत्रकधारकास दिल्या जाईल, वरीलप्रमाणे अन्नपदार्थाच्या नमुद दरानुसार दर आकारण्यात येतील. सदर अन्नपदार्थाच्या वाढीचे वेगळे दर आकारता येणार नाही. |
| ५) | **दरकरार धारकास महानगर पालिकेचे मेस चालविण्यासंबंधी प्रमाणपत्र व कॅटरिंग व्यवसाय/ अन्न व औषध प्रशासन विभागाचे (एफडीए) लायसन्स ची प्रत व जीएसटी प्रमाणपत्र, मागील वर्षाचे आयकर रिटर्न विवरणपत्र व पॅनकार्ड दरपत्रकासोबतच सादर करावे लागेल अन्यथा दरपत्रक अवैद्य ठरविण्यात येवून सदर दरपत्रक रद्द करण्यात येईल** . अर्जदाराचे पासपोर्ट साईज फोटो, पॅन कार्ड व आधार कार्डची साक्षांकित केलेली छायाप्रत सादर करणे आवश्यक आहे. |
| ६) | **ज्या दरपत्रकधारकाच्या नावाने आहार/जेवन पुरविण्याचा ठेका दिल्या जाईल त्याला स्वतः आहार/जेवन पुरवावे लागेल.** सदर पुरवठादार आपल्या नावावर दुसऱ्या व्यक्तीस किंवा व्यवसाकीयास आहार/जेवन पुरविण्याचे काम देवु शकणार नाही, असे आढळल्यास त्यांचे दरकरार रद्द केल्या जाईल व सुरक्षा ठेव जप्त करण्यात येईल. |
| ७) | रुग्णांना पुरेसे, स्वच्छ व उत्तम दर्जाचे, गरम व ताजे जेवण द्यावे लागेल. भोजन योग्यरीत्या न पुरवल्यास तसेच आहाराबाबत रुग्णांकडून वारंवार तक्रारी प्राप्त झाल्यास दरकरारकधारकाची सेवा बंद करण्यात येईल. दर पत्रकानुसार अटी व शर्तीचा भंग केल्यास दर करार धारकाला दंड करण्याचे तथा सुरक्षा ठेव जप्त करण्याचे अधिकार संस्थेला राहतील. |
| ८) | दरपत्रक धारकास रुग्णांना दररोज नाश्ता व चहा (सकाळी ७.०० ते ८.०० दरम्यान), दुपारचे जेवण (दु.१२.००), सायंकाळचा चहा (सायंकाळी ४.०० ते ५.०० दरम्यान) व सायंकाळचे जेवण (सायंकाळी ६.०० ते ७.०० दरम्यान) या वेळेतच पुरवठा करावा लागेल. **सदर वेळेत आहार विविध वार्डातील रुग्णांपर्यंत डिस्पोजेबल थाळी मध्ये पॅकींग करुन पोहोचविण्याची जबाबदारी दरपत्रक धारकाची राहील. दरपत्रक धारकास डिस्पोजेबल थाळी/प्लेट/कप यांची व्यवस्था स्वतः करावी लागेल.** |
| ९) | आहार बनविण्यासाठी लागणारा कच्चा माल, अन्नधान्य, मसाले, भाजीपाला व इतर पदार्थ अन्न व औषध प्रशासन विभागाच्या मानकाप्रमाणे असावी. |
| १०) | रुग्णांना आहार पुरवितांना स्वच्छतेचे पुरेशी काळजी घेवून अन्नपदार्थ पॅकिंगमधेच पाठविण्यांत यावेत. |
| ११) | भाजीपाला व इतर अन्न-धान्य धुण्यासाठी क्लोरीन युक्त पाण्याचा वापर करावा. |
| १२) | स्वयंपाकासाठी वापरण्यांत येणारे पाणी पिण्यास योग्य असावे. |
| १३) | स्वयंपाक बनवितांना कच्च्या अन्नपदार्थमध्ये फुड ॲडेटिव्हसचा वापर करु नये. |
| १४) | खानावळीतील जेवणाच्या गुणवत्तेबाबत जेवन तयार करण्यात येणा-या जागेवर तसेच वार्डात पोहचविण्यात येणा-या जेवणाची थाळीची वेळोवेळी तपासणी करण्यात येईल त्याबाबत दरपत्रकधारकास सहकार्य करावे लागेल. |
| १५) | खानावळीत काम करणाऱ्या कामगारांची वैद्यकीय तपासणी संस्थेतील बाहयरुग्ण विभागात करण्यात यावी. त्याचे प्रमाणपत्र कार्यालयास सादर करावे लागेल. तपासणीबाबतचा खर्च व जबाबदारी दर पत्रक धारकाची राहील. |

Scanned By Scanner Go

| | |
|---|---|
| १६) | न्युनतम दर पत्रक मंजूर झाल्यानंतर सदर दरपत्रकाधाकरास पुरवठा कालावधीपर्यंत रु.५०,०००/- एवढया रकमेची बॅक गॅरंटी अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांचे नावे सादर करावी लागेल. तसेच प्रत्यक्ष दरकरार सुरु करण्यापुर्वी संस्थेच्या अटी व शर्ति नुसार सात दिवसांच्या आत १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे दरपत्रकधारकास बंधनकारक राहील. |
| १७) | स्वयंपाक करण्यासाठी वापरण्यात येणारे खाद्य तेल, पदार्थ उच्च दर्जाचे असावे, ते आरोग्यास अपायकारक असू नये. |
| १८) | अन्नात कंकड, कॉक्रोच, मुंग्या, इत्यादी आढळल्यास किंवा अन्नाबाबत तक्रारी असल्यास किंवा रुग्णांना काही अपाय झाल्यास संपूर्ण जबाबदारी दरपत्रक धारकाची राहील. |
| १९) | रुग्णालयातील विविध वार्डात असलेल्या रुग्णांच्या संख्येच्या प्रमाणात कमी किंवा जास्त बदल होत असल्यास त्याबाबतची सुचना दरपत्रकधारकास एक दिवस अगोदर संबधित वार्ड इन्चार्ज सिस्टर कडून देण्यात येईल त्यानुसारच आहार (थाळी) पुरवठा करावा लागेल व दररोज नोंदवहीमध्ये त्यांची नोंद घेवुन इन्चार्ज सिस्टर व प्रभारी अधिकारी यांची दररोज स्वाक्षरी घ्यावी लागेल. रुग्णांना आवश्यकतेपेक्षा जास्त अथवा दीलेल्या संख्येपेक्षा जास्तीचे थाळी पुरवठा झाल्यास त्याची जबाबदारी दर पत्रकधारकाची राहील. |
| २०) | दर पत्रक धारकाला खानावळ बंद करावयाची असल्यास त्याची १ (एक) महिन्या पूर्वी तसी सूचना मा. अधिष्ठाता, शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांना द्यावी लागेल. असे न केल्यास संस्थेस संबंधित रुग्णांसाठी लागणारा १ (एक) महिन्याचा आहार प्रतिपूर्तीचा खर्च दर पत्रक धारकास दयावा लागेल. |
| २१) | प्रत्येक जेवणात भाजी वेगळी वेगळी दयावी लागेल. तसेच भर्ती असलेल्या रुग्णांपैकी लिक्विड डायट असलेल्या रुग्णांना वरणाचे पाणी, दूध, इत्यादी पुरवठा दोन वेळा करावा लागेल. व लहान मुलांना अतिरिक्त दूध, खिचडी, सोजी, इत्यादीचा पुरवठा दोन वेळा करावा लागेल. |
| २२) | लिफाफा क्रमांक १) तांत्रिक लिफाफयामध्ये खालील दस्ताऐवजांचा समावेश राहील<br>अ) पुर्व अनुभव असल्यास त्याबाबतची तपशीलवार माहिती व संबंधित कागदपत्रे.<br>ब) दरकरार धारकास महानगर पालिकेचे मेस चालविण्या संबंधीचे प्रमाणपत्र व कॅटरिंग व्यवसाय/ अन्न व औषध प्रशासन विभागाचे (एफ.डी.ए) लायसंस, अर्जदाराचे पासपोर्ट साईज फोटो, पॅन कार्ड व आधार कार्डचे साक्षांकित केलेली छायाप्रत राहील.<br>क) GST प्रमाणपत्र आवश्यक आहे.<br>लिफाफा क्रमांक २) दराचा लिफाफा- यामधे संस्थेच्या लेटरहेड वर दर नमूद करावेत. |
| २३) | दरकरारातील कोणत्याही अटी व शर्ती शिथील करणे अथवा वाढविण्याचे तसेच पुरवठादाराचे आहार पुरवठा करण्याबाबतची सेवा बंद करावयाचे असल्यास तात्काळ तशी पुर्वसचना देवून आदेश रद्द करण्याचे अधिकार मा. अधिष्ठाता, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर यांना राहतील. |

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
नागपूर

Scanned By Scanner Go